Handloom Mark

SILK MARK

# महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर

## (महाराष्ट्र शासन अंगिकृत प्रतिष्ठान)

# महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर.

स्थापना :- महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाची स्थापना सन 1971 ला तिडके समितीच्या शिफारसीनुसार कंपनी कायदा 1956 अंतर्गत करण्यात आलेली आहे.

उद्येश :- महाराष्ट्रातील परंपरागत हातमाग व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व कुशल विणकरा द्वारे उत्पादित उच्च प्रतीच्या कापडाची ओळख कायम असावी व कुशल विणकरांना रोजगार उपलब्ध होत राहावे या सामाजिाक दृष्टीकोणातून हातमाग महामंडळास जीवंत ठेवणे हा प्रमुख उद्येश आहे.

सामाजिक बांधीलकीच्या दृष्टिकोनातुन करार पध्दती अंतर्गत विणकरांकडुन उत्पादन करुन घेण्यात येते. महामंडळाशी जुळलेली विणकर व हातमाग सहकारी संस्थांच्या माध्यमातुन विक्रीची पुर्तता पूर्ण करण्यात येते.

महामंडळाकडे 21 जिल्हे जसे नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, औरंगाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, धुळे, नंदुरबार व बीड तसेच महाटेक्सकडे 15 जिल्हे ठाणे, जळगाव, पुणे, अहमदनगर, नाशिक, पालघर, रायगड, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, सांगली, सिंधुदूर्ग, रत्नागीरी, मुबंई शहर व मुबंई उपनगर विक्री करिता विभाजुन दिलेले आहे. नकाशातुन याची कल्पना येईल.



## -: संचालक मंडळ :-

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | रिक्त |
| उपाध्यक्षा | : | श्रीमती शीतल तेली-उगले, भा.प्र.से.<br>आयुक्त (वस्त्रोद्योग) महाराष्ट्र शासन |
| सदस्य | : | श्रीमती शीतल तेली-उगले, भा.प्र.से.<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर. |

* अतिरिक्त हातमाग विकास आयुक्त, नवी दिल्ली
* श्री. स. दि. खरात, उपसचिव (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन
* श्री. प्रसेनजीत कारलेकर, कक्ष अधिकारी (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन
* बँकेचे प्रतिनिधी

## -: महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती :-

## 1971 पासून आजपर्यंत

| | | |
|---|---|---|
| 1) अधिकृत भाग भांडवल | रुपये | 90.60 कोटी |
| 2) प्राप्त भाग भांडवल | रुपये | 90.60 कोटी |

## शासकीय कर्ज.

अ) महामंडळास सन 2004 पर्यंत दिलेले कर्ज

30.48 कोटी मुद्दल

25.12 कोटी व्याज

एकुण 55.60 कोटी

उपरोक्त कर्ज व त्यावरील व्याजाचे भागभांडवलात रुपांतर करण्यास प्रस्ताव (शासन स्तरावर) प्रलंबित आहे.

ब) महामंडळास सन 2004 नंतर दिलेले कर्ज

| | |
|---|---|
| 1) कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छा निवृत्ती व विणकरांना असंलग्न करण्यासाठी. | रु. 18.08 कोटी |
| 2) महामंडळास अर्थसहाय्य | रु. 2.00 कोटी |
| 3) उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कर्मचारी कपातीबाबत भरपाई देण्याकरिता कर्ज | रु. 3.21 कोटी |
| | रु. 23.29 कोटी |
| क) उपरोक्त कर्जावरील 31-03-2021 पर्यंतचे व्याज | रु. 33.17 कोटी |
| 4) अ, ब, क एकुण | रु. 112.06 कोटी |

सन 2021 पर्यंत वरील प्रमाणे कर्ज व व्याज मिळून रु. 112.06 एवढ्या रक्कमेचे रुपांतर भागभांडवलात करणे गरजेचे आहे व त्याकरीता अधिकृत भागभांडवलाची मर्यादा रु. 200 कोटी करणे आवश्यक आहे.

# महामंडळास झालेल्या तोट्याचे वर्गीकरण

## (सन 1971 पासून ते 2020 पर्यंत)

| | | |
|---|---|---|
| अ) कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छा निवृत्ती व विणकरांचे असंलग्न योजनेसाठी | : | 35.26 कोटी |
| ब) कर्जावरील व्याजाची तरतूद | : | 79.67 कोटी |
| क) व्यापारी तोटा | : | 26.25 कोटी |
| | | 141.18 कोटी |

# तोट्याची कारणे

* 1976 साली केंद्र पुरस्कृत जनता कापड योजना सुरु झाली. विणकरांची संख्या 14000 पर्यत पोहोचली. भरभराटीचे दिवस, स्वस्त कापड योजनेअंतर्गत रेशनींग मार्फत स्वस्त दरात विक्री, अनुदान माध्यमातून अर्थसहाय्य प्राप्त.
* 1998 साली केंद्र शासनाने जनता कापड योजना बंद केली.
* महामंडळाशी संलग्न विणकरास एकरकमी सानुग्रह अनुदान देऊन असंलग्न करण्यात आले.
* रोजगाराच प्रश्न, हातमाग उत्पादनावर परिणाम, स्पर्धा व विक्रीत घट, कर्ज व व्याज चा बोझा.

* महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाची विक्री केंद्र :

1. हातमाग परिसर, उमरेड रोड, नागपूर.
2. जे.पी. चेम्बर्स क्र. 1, माटे स्क्वेअर, नागपूर.
3. नागपूर एअरपोर्ट, नागपूर.
4. गुलमोहर हॉल समोर, खामला, नागपूर
5. अभ्यूदयनगर, कालाचौकी, मुंबई.
6. जनता मार्केट, शिवाजी नगर, नांदेड.
7. नॉर्थ सुपर मार्केट, औरंगपूरा, औरंगाबाद.
8. जुनी सचिवालय इमारत, द्वार क्र. 4, सिव्हील लाईन, नागपूर.
9. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या., दिल्ली एम्पोरियम, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली.
10. औरंगाबाद एअरपोर्ट, औरंगाबाद

## -: महामंडळाचे कार्य व राबविण्यात येणाऱ्या योजना :-

1) टस्सर करवत काठ साडी व पैठणी साडी GI Registration प्राप्त.
2) चोळखण, वॉलहॅगींग हिंबरु फॅब्रीक्स, कॉटन साडी GI करिता प्रस्ताव सादर.
3) इंडिया हॅन्डलूम ब्रान्ड अंतर्गत नागपूर येथे शोरुम मंजूर व यशस्वीरित्या विक्री सुरु
4) करवती साडी, घीचा कापड, गारमेन्ट यांना इंडिया हॅन्डलूम ब्रान्ड अंतर्गत मान्यता प्राप्त.
5) महाराष्ट्रातील वेगवेगळया ठिकाणी हातमाग कापडाचे उत्पादन केंद्र सुरू.
6) महामंडळाद्वारे उत्पादीत मालापासून तयार केलेले ड्रेसेस परिधान करुन मॉडेल्सनी भारताचे प्रतिनिधीत्व चायना येथे मिस वर्ल्ड टुरिझम - 2018, व साउथ आफ्रीका (डर्बन) येथे मिसेस युनिवर्स 2017 पुरस्कृत. तसेच फेमिना मिस इंडिया 2020 प्रतियोगीतेमध्ये भाग व 5 वे स्थान तथा लॅक्मे फॅशन विक 2020 महामंडळाच्या वस्त्राची जाहीरात व प्रसिध्दी.
7) इंडिया हॅन्डलूम ब्रान्ड उत्पादने टायटन शोरुम बंगलोर व एम एस एस आय डी सी नवी दिल्ली व मुंबई शोरुम मार्फत विक्री.

8) इंडिया हॅन्डलूम ब्रान्ड अंतर्गत मान्यतेस दरी, बस्करीपट्टी, डस्टर कापड, कॉटन शर्टींग, पेडांकल शर्टींग, टस्सर खादी कापड व सिल्क साडी कापड, टस्सर खादी साडी व टस्सर स्पन साडीचा प्रस्ताव सादर.

9) विणकरीत नविन बदल घडवून आणणे, नविन टेक्चर विकसित करुन ब्लांडेड फॅब्रीक्स तयार करीत आहे जसे केळी बांबू, खादी सिल्क टस्सर व कॉटन इ.

10) उत्पादित मालावर नैसर्गिक रंगाचा वापर करुन वेगळी रेंज तयार करणे.

11) वेगवेगळया डिझाइनर्सची मदत घेऊन हातमाग कापडांचे उत्पादन दर्जा सुधारणे तसेच नविन वस्त्र निर्मिती करणे.

12) लवकरच शिर्डी देवस्थान परिसरात विक्री केंद्र सुरु होत आहे.

13) विविध प्रकारच्या मार्केटींग एजन्सीला कामे देऊन हातमाग कापडाची प्रचार प्रसिध्दी करणे.

14) इंटर्नशिपचे माध्यमातून आवश्यकतेप्रमाणे फॅशन डिझायनर्स, कॅड, टेक्सटाइल्स डिझायनर्स, बी फाईन आर्ट, (चित्रकला, फोटोग्राफी, पत्रकारिता, सेल्समनशिप) - ची सेवा प्रमाणपत्र व मानधनावर घेण्याची कार्यवाही.

15) महामंडळाद्वारे नागपूर मेट्रो अंतर्गत एक-दोन मोक्याचे ठिकाणी शोरूम उघडण्याची कार्यवाही सुरु

16) महामंडळाद्वारे विणकरांना "मागेल त्यांना काम" या मोहीमे अंतर्गत गरजु संस्था किंवा व्यक्तींना कामे वाटपाचे धोरण सुरु तसेच फायबर ते फॅब्रिक व फॅब्रिक ते फॅशन संकल्पना डोळ्यासमोर ठेवून उत्पादनाकडे लक्ष केंद्रीत .

17) इंटर्नशिपचे माध्यमातून प्रख्यात कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनमध्ये फॅशन शो चे आयोजन व महामंडळाचे ॲप तथा कापडाची प्रचार प्रसिध्दी.

18) महामंडळाचे परिसरात टस्सर रिलिंग सेंटर सुरु करण्याची कार्यवाही.

19) महामंडळाद्वारे गावोगावी फिरते विक्री केंद्राचे माध्यमातून इंद्रायणी उत्पादनाची प्रचार प्रसिध्दी.

20) महामंडळाद्वारे "माविम" चे माध्यमातून गरजु स्त्रियांना रोजगार मिळण्यास मदत व्हावी या उद्येशाने हातमाग हॅन्डिक्राफ्टची उत्पादने तयार करण्यास प्रोत्साहीत करुन महामंडळाशी जोडण्याची कार्यवाही सुरू आहे.

21) महामंडळाद्वारे "लग्नसराई" निमित्त लग्न बस्ताअंतर्गत दूल्हा-दूल्हन ड्रेसेस तयार करुन इंद्रायणी वस्त्रांची प्रचार प्रसिध्दी.

22) "प्रतिष्ठित नारी प्रतिष्ठित साडी" या नावाने इंद्रायणी वस्त्राची प्रचार प्रसिध्दी.

23) उत्पादीत मालाची विक्री प्रामुख्याने राष्ट्रीय हातमाग प्रदर्शनी, स्पेशल हॅन्डलुम एक्स्पो., जिल्हास्तरीय प्रदर्शनी, सिल्क फॅब प्रदर्शनी मार्फत केली जाते.

24) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाव्दारे www.indrayanihandlooms.com, App. MH-Digiloom, IoS ॲप आयफोन व ॲमेझॉन इत्यादी मार्फत ऑनलाईन विक्री करण्यात येते.

25) प्रचार प्रसिध्दी - फॅशन मॅक्झीन फेमिना, इंडिया टूडे, टाईम्स ऑफ इंडिया, हिंदूस्थान टाईम्स, अपरेल मॅक्झीन, विमानतळावर होर्डींग व डिजीटल स्क्रीन, फॅशन शो, बारकोडींग सिस्टीम, होर्डिंग, स्टॅंडी, एफ. एम., आकाशवाणी, बॅनर/पॉम्प्लेट व वर्तमानपत्रा मार्फत करण्यात येते.

26) हातमाग महामंडळाव्दारे, विणकरांची व उत्पादीत मालाची माहिती दर्शविणारे टॅगींग कार्ड लावलेले आहे.

27) महामंडळाने टस्सर सिल्क उत्पादनात नाव कमविले आहे.

28) महामंडळातील उत्पादनाची प्रचार प्रसिध्दी विदेशात होत आहे.

29) महामंडळाने स्वत:चे ऑनलाईन वेबसाईट व ॲप सुरु केले आहे.

30) महामंडळाने केळी व बांबू याचा हातमागावर वापर सिल्क टस्सर व कॉटन सोबत ब्लँड करुन ड्रेस मटेरियल विकसीत केलेले आहे. यास चांगली मागणी येत आहे. व असे उत्पादन करणारे हातमाग महामंडळ एकमेव उत्पादक संस्था आहे. या सर्व कार्यास्तव आर्थिक मदतीची गरज आहे.

31) सद्या हातमाग महामंडळ अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. महामंडळाचे *मागेल त्याला काम* याप्रमाणे विणकरांना रोजगार निर्मितीचे दृष्टिने विणकरांना रोजगार हमी, नवीन युवकांना प्रशिक्षण देऊन विणकाम व्यवसायाकडे वळविण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे परंपरागत असलेली कला जिवंत ठेवण्यात यश येत आहे. परंतु महामंडळाची आर्थिक परिस्थिती बरीच अडचणीची असल्यामुळे त्यात बाधा निर्माण होत आहे. तरी शासनाकडून तातडीची मदत झाल्यास महामंडळ खरेतर देशात इतर महामंडळाचा तुलनेत अग्रेसर ठरु शकते.

## -: महामंडळाच्या अडचणी :-

1) रेशीम विभागाकडून टस्सर रिल्ड सुताचा अनियमीत व तुटक पूरवठा
2) अर्थ सहाय्याचा तुटक पुरवठा -
   * विपणन व प्रचारप्रसिद्धीची गरज
   * मजूरी वाढ
   * नविन उत्पादनाकरिता कच्चा माल खरेदी
   * नविन विणकरांना प्रोत्साहीत करणे.
   *आधुनिकीकरण करणे आवश्यक असल्याने भागभांडवल अपूरे पडत आहे.
3) वयोवृध्द विणकर, जुने हातमाग
4) नवीन पिढीची रोजगाराकडे पाठ
5) बँकेचे कर्ज व व्याजा पोटी होणारा खर्च
6) शासनाचे कर्ज स्वरुपात मदत व त्यावरील व्याज

## उपाययोजना-

* भागभांडवल रुपये 90.60 कोटीहून रुपये 200 कोटी करणे. प्रस्ताव शासनास सादर.
* शासकीय कर्ज रुपये 23.29 कोटी (असंलग्न योजना, कर्मचारी स्वेच्छा निवृत्ती, खेळते भांडवल, उच्च न्यायालयाचे आदेशान्वये कोर्ट केस) व त्यावरील व्याज रुपये 33.17 कोटी असे एकूण रुपये 56.46 कोटी भाग भांडवलात रुपांतर करणे.
* 20% रिबेट योजना राबविणे प्रस्ताव शासनास सादर.
* शासकीय पुरवठा पोटी 50% अग्रिम देणे. व हातमागाचे कापड खरेदी करण्यास शासकीय कार्यालये अंतर्गत शाळांना बांधील करणे. उदा. आदिवासी, जिल्हापरिषदा, नगरपरिषद महानगरपालीका, इ.

# -: वस्त्रोद्योग धोरण सन 2018-23 :-

# परिशिष्ट 8.2

वस्त्रोद्योग धोरण सन 2018-23; 8.2 हातमाग विकास मध्ये ''महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळाचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने दिलेल्या कर्जाचे व त्यावरील व्याजाचे शासकीय भागभांडवलात रुपांतर करण्यात येईल'' असे स्पष्ट निर्देश आहेत. या निर्देशाची त्वरीत अमलबजावणी होऊन कर्ज व व्याजाचे रुपांतर भागभांडवलात होण्याच्या दृष्टिने भागभांडवल रुपये 90.60 कोटीहून रुपये 200 कोटी पर्यंत करण्यास मान्यता प्रदान करणे गरजेचे आहे. शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

हातमाग महामंडळाव्दारे विदर्भ, मराठवाडा या भागातील विणकर व हातमाग सहकारी संस्था यांना प्रशिक्षण व बळकट करण्याच्या माध्यमातून स्वयंनिर्भर करुन त्यांच्या व्दारा उत्पादित मालाची विपणन व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी हातमाग महामंडळाव्दारे घेण्याचे प्रस्तावीत आहे.



टस्सर रिलींग सेंटर येथे काम करणाऱ्या महिला



कूकून मधून सूत काढतांना महिला

चरख्याच्या सहाय्याने सूत
भराई करणे





वार्पिंग ड्रम


हातमागावर चादर
विणतांना विणकर





हातमागावर टस्सर साडी
तयार करतांना विणकर





विणकाम करतांना हातमाग महामंडळाचे विणकर







कुशल डिझाईनर्सच्या मदतीने
तयार करण्यात आलेले सिल्कचे
रेडीमेड वस्त्र



नव्याने तयार करण्यात आलेले सिल्क टाय




नव्याने तयार करण्यात आलेले सिल्क पर्स







बांबू व बनाना सिल्कचे नव्याने तयार केलेले रेडीमेड वस्त्र







"मागेल त्यांना काम" या योजने अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळद्वारे बनविण्यात आलेले फोल्डर फाईल व पर्स










मागेल त्यांना काम या योजने अंतर्गत तयार करण्यात आलेले रेडी टू विअर

नऊ वार साडी

नव्याने बनविण्यात येणारे पोटली, हॅन्डबॅग, शॉपींग बॅग, पर्स, इ.









हातमाग कापडांच्या प्रचार प्रसिध्दी करीता मॉडेलद्वारे फोटोशूट




**Amazon चे उद्घाटन**



मोबाईल ॲप **MH-Digiloom** चे उद्घाटन




साऊथ आफ्रीका, डर्बन येथे हातमागाच्या वस्त्रांचे प्रदर्शन करून मिस लव्हली युनिव्हर्स-2017 चे अवार्ड प्राप्त .





महामंडळाच्या तयार केलेल्या
वस्त्रांचे मॉडेलद्वारे मिस वर्ल्ड
टूरीझम - 2018, चायना
येथे प्रतिनिधित्व




हातमाग महामंडळाचे नागपूर येथील मुख्यालय

IHB अंतर्गत हातमाग मंडळाचे शोरूम





टस्सर करवती किनार साडी
मिनिस्ट्री ऑफ टेक्सटाईल
मार्फत
GI इंडीकेशन मार्क प्राप्त











हातमाग महामंडळाच्या विणकरांद्वारे

तयार केलेली पैठणी

GI प्राप्त

धन्यवाद.